# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड

## प्रेसनोट ता. ३०/०८/२०२४

## सराईत गुन्हेगाराकडुन गावठी बनावटीचे पिस्टल व काडतुस हस्तगत

## हिंजवडी पोलीस गुन्हे शोध पथकाची कामगीरी

मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी आगामी येणाऱ्या सण उत्सव व निवडणुका या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय हददीतील अवैध शस्त्रे बाळगणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करुन तसेच गोपनीय माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेशीत केल्याने, दि. २९/०८/२०२४ रोजी हिंजवडी पोलीस ठाणे कडील गुन्हे शोध पथकातील सपोफौ नरेश बलसाने, पोलीस अंमलदार अरुण नरळे, कुणाल शिंदे, स्वप्नील साबळे असे हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध शस्त्रे शोध व कारवाईकामी पेट्रोलिंग करीत असताना पो.हवा./८३३ कुणाल शिंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कासारसाई ता. मुळशी जि. पुणे येथे एक इसम गावठी पिस्टल विक्री करीता घेऊन येणार आहे अशी बातमी मिळाल्याने सपोफौजदार  नरेश बलसने यांनी सपोनि राम गोमारे, यांना कळविले, सपोनि राम गोमारे यांनी सदर बातमीचा आशय वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कन्हैय्या थोरात यांना कळवुन त्यांनी सदर बातमीची खात्री करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने गुन्हे शोध पथकाने बातमीप्रमाणे सापळा लावुन कासारसाई गणपती मंदीराजवळ इसम नामे विशाल दत्तात्रय काकडे,वय-१९ वर्षे,रा. बोडकेवाडी माण ता. मुळशी जि. पुणे. यांस २१/१० वा. शिताफीने ताब्यात घेवून पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे पँटचे डावे बाजुस खोचलेले गावठी लोखंडी पिस्टल व पँटचे चोर खिशा मध्ये एक राऊंड मिळून आल्याने त्याचेवर **हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं. ९८६/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), मुंबई पोलीस अधिनियम ३७ (१) १३५ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीस दिनांक ३०/०८/२०२४ रोजी ०३/२० वा. अटक करण्यात आले आहे. सदर आरोपीचे पुर्वरेकॉर्ड तपासले असता त्यांचेवर यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१. **हिंजवडी पोलीस स्टेशन गु.रं.न. ७२७/२३ भा.द.वि. ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४१, १४३, १४५, १४७, १४७, १४९**
२. **हिंजवडी पोलीस स्टेशन गु.रं.न. ४०१/२४ भा.द.वि. ३२४, ३२३, १४३, १४६, १४९**
३. **हिंजवडी पोलीस स्टेशन गु.रं.न. ५०५/२४ भा.द.वि. ३२४, ३२३, ३४**

**सदरची कारवाई मा. श्री. विनय कुमार चौबे साो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ. शशीकांत महावरकर सो. सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी सो. अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. सुनिल कुऱ्हाडे सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग पिं चिं यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कन्हैया थोरात, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. ऋषीकेश घाडगे, तपास पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक राम गोमारे, श्रेणी पोलीस उप निरीक्षक बंडू मारणे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण शिंदे, नरेश बलसाने, बापुसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, कैलास केंगले, कुणाल शिंदे, विक्रम कुदळ, अरूण नरळे, रितेश कोळी, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, दत्ता शिंदे, ओमप्रकाश कांबळे, स्वप्नील साबळे, मंगेश लोखंडे यांनी केली आहे.**

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,
पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड